**(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)**
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
***Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik***

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक
**Meeting of the Board of Management**

## कार्यवृत्त
**Mminutes of Meeting**

**बैठक क्रमांक** (Meeting Number) : 184

**स्थळ** : विद्यापीठ मुख्यालय सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२

**Venue** : Administrative Building Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : सोमवार ,दिनांक २९ ऑगस्ट २०२२
**(Day and Date )** Monday, 29th August 2022

**वेळ** : **सकाळी ११.३०** वाजता

**Time** : 11.30AM

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.184 सोमवार दिनांक 29 ऑगस्ट 2022 सकाळी 11.30 वाजता विद्यापीठ मुख्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

01. डॉ.पी.जी.पाटील, कुलगुरू (Online) अध्यक्ष
02. प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली सदस्य
03. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंगांरामुवि, नवी दिल्ली सदस्य
04. श्री. वि.अ.दळवी, संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई यांचे प्रतिनिधी सदस्य
05. श्री.हरिहर कौसडीकर, सचिव, कृषी विभाग यांचे प्रतिनिधी सदस्य
06. डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे सदस्य
07. श्री.उदित सेठ, मुंबई (Online) सदस्य
08. आमदार डॉ. सुधीर तांबे, नाशिक (Online) सदस्य
09. आमदार श्री. सुहास कांदे, नाशिक सदस्य
10. आमदार श्रीमती सरोज आहिरे, नाशिक सदस्य
11. डॉ.संजय चोरडिया, पुणे सदस्य
12. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा सदस्य
13. डॉ. प्रकाश देशमुख, कुलसचिव सचिव

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

14. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई सदस्य
15. सचिव, उद्योग, मुंबई सदस्य
16. संचालक, उच्च शिक्षण, पुणे सदस्य
17. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई सदस्य
18. प्रा.डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर सदस्य
19. श्री. विलास शिंदे, नाशिक सदस्य

| **विषय क्र.** | **उपविषय ठराव क्र** | **तपशील** |
|---|---|---|
| 184.1.0 | 184.1.1 | **स्वागत** (Welcome) |
| 184.2.0 | 184.2.1 | दि. 30 एप्रिल 2022 रोजी झालेल्या 182 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** दिनांक 30 **एप्रिल,** 2022 रोजी झालेल्या 182 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले |
| | 184.2.2 | दिनांक 16 मे 2022 रोजी झालेल्या 183 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 16 मे 2022 रोजी झालेल्या 183 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीचे कार्यवृत्त वाचून कायम करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 184.2.3 | दिनांक 30 एप्रिल 2022 रोजी झालेल्या 182 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 30 एप्रिल 2022 रोजी झालेल्या 182 व्या व्यवस्थापन बैठकीतील (Online) झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | 184.2.4 | दिनांक 16 मे 2022रोजी झालेल्या 183 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 16 मे 2022 रोजी झालेल्या 183 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद एकत्रित बैठकीत झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| 184.3.0 | **सखोल चर्चेचे विषय (In-Depth Discussion Items)** | |
| | 184.3.1 | **ग्रंथालय व माहितीस्त्रोत केंद्रामध्ये सन 2022-23 या वर्षासाठी वाचनसाहित्य ट्रेड-टर्म्स निश्चिती करण्याबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील ग्रंथालय समितीने घेतलेला निर्णय अमान्य करण्यात आला. ग्रंथालय समितीने पुस्तके खरेदी करण्यासंदर्भातील कार्यपध्दतीचा अवलंब करावा. (उदा. राज्यस्तरीय वृत्तपत्रात जाहीरात देणे, निविदा प्रसिध्द करणे, जेम्स पोर्टलमार्फत खरेदीची प्रक्रिया करणे) तसेच पुस्तके खरेदीबाबत दहा ट्रस्टला पत्रव्यवहार करावा. ह्या दहा ट्रस्टची नावे मा.आमदार श्री सुहास कांदे यांचेकडून घेण्यात यावीत व त्यांना पत्रव्यवहार करावा असे सांगितले. सदर प्रक्रियेकरिता वित्त समितीचा सदस्याची नेमणूक करावी. शासकीय नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया झाल्यावर पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीस सदरचा विषय निर्णयार्थ ठेवावा असे ठरले. |
| | 184.3.2 | **विद्यापीठातील संगणक, मॉनिटर्स व प्रिंटर्स निर्लेखनाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील संगणक, मॉनिटर्स, प्रिंटर्स कालबाह्य झालेल्या उपकरणांची विल्हेवाट (निर्लेखनाबाबत) लावण्याबाबत संपूर्ण योजना तयार करुन व्यवस्थापन मंडळ सदस्यांना सादर करावी असे ठरले. तसेच दिनांक 4 जानेवारी 2008 च्या शासन निर्णयातील कार्यपध्दतीनुसार ग्रीन सर्टिफिकेट असलेले एजन्सीमार्फत निर्लेखन करावे. यापुढे निर्लेखन समिती गठीत करून या समितीस व्यवस्थापन मंडळाची मान्यता घ्यावी असे ठरले. त्यानंतर निर्लेखनाबाबत कार्यवाही करावी. |
| | 184.3.3 | **यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या स्टॅट्युट समितीने सादर केलेल्या शिफारशी मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांना पदोन्नती देण्यासाठी स्थापन केलेल्या स्टॅट्युट समितीने सादर केलेल्या शिफारशी सर्व व्यवस्थापन मंडळ सदस्यांना पाठवाव्यात. यांसदर्भात शैक्षणिक पात्रताबाबतची माहिती संचालक, व्यावसियक शिक्षण यांचे प्रतिनिधी श्री.वि.अ.दळवी, यांचेकडून तपासून घ्यावी. व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांकडून आलेल्या सुचना, मार्गदर्शन, बदल याची नोंद घेऊन पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीस सदरचा विषय निर्णयार्थ सादर करावा असे ठरले. |
| | 184.3.4 | **दिनांक 30 जुन, 2022 रोजीच्या गट अ मधील उपकुलसचिव पदावरील पदोन्नती समितीची शिफारस मान्यतेसाठी सादर.** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाच्या गट अ मधील पदावरील पदोन्नती समितीवर एका व्यवस्थापन मंडळ सदस्याची नियुक्ती करावी अशी सूचना व्यवस्थापन मंडळ सदस्य मा.डॉ.सत्यकाम यांनी मांडली. यापुढे सेवापुस्तक, संपूर्ण सेवाज्येष्ठता यादी आणि आरक्षण बिंदूनामावली व्यवस्थापन मंडळापुढे ठेवण्यात यावी. विद्यापीठ अध्यादेश क्रमांक 8 of 1993 नुसार सेवाज्येष्ठता यादी, मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल, त्याची प्रतवारी, आरक्षण इ तपासून पदोन्नतीची कार्यवाही केली जाते. व्यवस्थापन मंडळ सदस्याचा समावेश करण्यासाठी अध्यादेशमध्ये बदल करावा लागेल. या प्रक्रियेस बराच कालावधी लागू शकतो. त्यामुळे दिनांक 30 जुन, 2022 रोजीच्या गट अ मधील उपकुलसचिव पदावरील पदोन्नती समितीची शिफारशींना मान्यता देण्यात यावी. तसेच अध्यादेश क्रमांक 8 of 1993 मध्ये बदल करण्यासाठी पुढील बैठकीत सदरचा विषय ठेवण्यात यावा असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 184.3.5 | **प्राध्यापक व कुलसचिव पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती घेण्यासाठी निवड समितीत सदस्यांचे नामनिर्देशन व्यवस्थापन मंडळाने करावयाचे असल्याने त्याबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर.** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - (1) **प्राध्यापक पदांच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती** घेण्यासाठी निवड समितीत विषय तज्ञ म्हणून विद्याशाखानिहाय सदस्यांचे नामनिर्देशन करण्यासाठी व्यवस्थापन मंडळ सदस्यांची नियुक्ती करावी असे मा.आमदार श्री.सुहास कांदे यांनी सुचविले. मात्र यासंदर्भात युजीसी आणि शासनाच्या नियमानुसार करणे आवश्यक असल्याने व्यवस्थापन मंडळाकडून विषय तज्ञांची नावे निश्चित केली जातात. ही नावे डॉ.महेंद्र लामा यांच्याकडून निश्चित करून घ्यावीत असे सर्वनुमते ठरले. तसेच यासंदर्भात मा.कुलगुरूंनी नवीन कुलगुरू नियुक्त झाल्यानंतर नियुक्तीची कार्यवाही करावी असे सांगितले. यावर सर्व सदस्यांनी निवडीची प्रक्रिया पूर्ण करावी असे सांगितले. यासाठी विद्यापीठाच्या कायदेशीर सल्लागार, महाराष्ट्र शासन आणि मा.कुलपती कार्यालयाकडून याबाबतचे मत घेऊन पुढील कार्यवाही करावी असे ठरले.<br>(2) **कुलसचिव पदाच्या पात्र उमेदवारांच्या मुलाखती** घेण्यासाठी निवड समितीत मा. डॉ.अनिल कुलकर्णी व मा.आमदार.श्री.सुहास कांदे यांची व्यवस्थापन मंडळ सदस्य म्हणून नामनिर्देशन करण्यास मान्यता देण्यात आली व त्याबाबतची निवडीबाबतची कार्यवाही पूर्ण करावी असे ठरले. |
| | 184.3.6 | **विद्यापीठातील नियमित शिक्षक मे/जुन 2020, ऑक्टोबर/नोव्हेंबर 2020 आणि मे/जुन 2021याकोविड कालावधीतील दीर्घ सुट्टया उपभोगलेल्या नसल्याने तीनही कालावधीच्या सुट्ट्या 2:1प्रमाणात जमा करण्याबाबतचा निर्णय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील नियमित शिक्षक मे/जुन 2020, ऑक्टोबर/नोव्हेंबर 2020 आणि मे/जुन 2021 या कोविड कालावधीतील दीर्घ सुट्टया उपभोगलेल्या नसल्याने तीनही कालावधीच्या सुट्ट्या 2:1 प्रमाणात जमा करण्यास मान्यता देण्यात आली. यापुढे नियमात बदल करावयाचा असल्यास व्यवस्थापन मंडळापुढे ठेवण्यात यावा असे डॉ.महेंद्र लामा यांनी सुचविले यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 184.3.7 | **श्री.कैलास वेडू शिंदे, वाहनचालक यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीबाबत गठीत केलेल्या न्यायाधिकरणाचा निर्णय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - श्री.कैलास वेडू शिंदे, वाहनचालक यांच्या सक्तीच्या सेवानिवृत्तीबाबत गठीत केलेल्या न्यायाधिकरणाने घेतलेला तडजोडीच्या निर्णयास मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे सेवानिवृत्तीची पुढील कार्यवाही सुरू करण्यात यावी. अशा प्रकारची परिस्थिती कोणत्याही कर्मचाऱ्यावर येणार नाही असे डॉ.महेंद्र लामा यांनी सांगितले. |
| | 184.3.8 | **विद्यापीठातील एका सेवानिवृत्त कर्मचा-याच्या निवृत्तीवेतनाच्या अनुषंगाने त्रुटींच्या पूर्ततेबाबत समितीचा अहवाल मान्यतेसाठी सादर** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठातील श्री.राजेंद्र बाबुराव मरकड, प्रोग्रामर या सेवानिवृत्त कर्मचाऱ्याची निवृत्तीवेतनाच्या अनुषंगाने त्रुटींच्या पूर्ततेबाबत व्यवस्थापन मंडळाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशीला मान्यता देण्यात आली |
| | 184.3.9 | **दिनांक 19 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या वित्त अधिकारी पदाच्या निवडीबाबत — निवडसमितीच्या अहवालास मान्यता प्रदान करणेबाबत** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 19 ऑगस्ट, 2022 रोजी झालेल्या वित्त अधिकारी पदासाठी निवड समितीने श्री. गोविंद बबनराव कतलाकुटे यांची वित्त अधिकारी म्हणून केलेल्या शिफारशीस मान्यता देण्यात आली. |
| | 184.3.10 | **वित्त समिती बैठक दिनांक 27 ऑगस्ट, 2022 चे कार्यवृत्त मान्यतेसाठी सादर —**<br>सन 2022-23 या आर्थिक वर्षातील वित्त समितीची बैठक क्र. 3 दिनांक 27 ऑगस्ट 2022 रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत घेतलेले निर्णय व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर करण्यात आले. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** —दिनांक 27 ऑगस्ट, 2022 रोजी झालेल्या वित्त समितीच्या बैठकीचे कार्यवृत्तास व्यवस्थापन मंडळाच्या वतीने मान्यता देण्यात आली. |

| | |
|---|---|
| | **मा. अध्यक्षांच्या व उपस्थिती सन्माननीय सदस्यांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय** |
| 184.4.1 (ए) | **वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना यशवंतराव चव्हाण व प्रायोजकांनी सुचविलेल्या शिक्षणक्रमांना सुवर्णपदक देण्यास मान्यता मिळणेबाबत**<br>1) वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना विशेष प्राविण्य मिळालेल्या विद्यार्थ्यांना सुवर्णपदके दिली जात होती. मात्र सदर शिक्षणक्रम तांत्रिक कारणांनी बंद झालेले असल्याने विद्याशाखेने संबंधीत प्रायोजकांना संपर्क साधून त्यांच्या नावे असलेले सुवर्णपदक विद्याशाखेच्या एम.एस्सी (मॅथेमॅटिक्स), एम.एस्सी (फिजीक्स) शिक्षणक्रमास द्यावे असे सुचविले. त्याप्रमाणे त्यांनी संमती दिली असून पत्र पाठविलेले आहे. सदरचा विषय व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेसाठी सादर. |
| | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - वास्तुकला, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना असलेले सुवर्णपदक विद्याशाखेच्या एम.एस्सी (मॅथेमॅटिक्स), एम.एस्सी (फिजीक्स) या शिक्षणकार्मांना सुवर्णपदके देण्यास मान्यता देण्यात आली. |
| 184.4.2 (बी) | 2) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने "यशवंतराव चव्हाण सुवर्णपदक" या नावाने प्रायोजित करुन खालील नऊ शिक्षणक्रमात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यास विद्यापीठाकडून "यशवंतराव चव्हाण सुवर्णपदके" ह्या नावाने देण्यासंदर्भातील संबंधीत विद्याशाखेने सादर केलेला प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर.<br>1) B.Sc. ( Physics, Chemistry, Mathematics ) 2)Diploma in Statics<br>3) Diploma in Environmental Science 4)M.Sc. Mathematics<br>5) M.Sc. Physics 6) M.Sc. Chemistry<br>7) M.Sc. Zoology 8)M.Sc. Botany<br>9) M.Sc. Environmental Science |
| | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - विद्यापीठाने प्रायोजिलेले "यशवंतराव चव्हाण सुवर्णपदक" वरील नऊ शिक्षणक्रमास देण्याबाबत एक अभ्यासगट स्थापन करून सदरचा अभ्यासगट या नऊ शिक्षणक्रमांना विद्यापीठाने प्रायोजित केलेले सुवर्णपदक देण्याबाबत अहवाल तयार करुन, सदर अहवाल पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत निर्णयासाठी ठेवण्यात यावा असे ठरले. सदरचा अभ्यासगट मध्ये व्यवस्थापन मंडळ सदस्य मा.डॉ.जयदीप निकम, संबंधित विद्याशाखा संचालक, डॉ.सुनंदा मोरे आणि परीक्षा नियंत्रक श्री.बी.पी.पाटील यांची अभ्यासगट समिती नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. |
| 184.4.3 | **अकृषि विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करणेबाबतचा महाराष्ट्र शासनाचा निर्णयावर कार्यवाही करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर..** |
| | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - शासन निर्णय क्र. संकीर्ण-2016/प्र.क्र.262/16/विशि-1 उच्च व तंत्रशिक्षण विभाग दिनांक 25 ऑगस्ट 2022 नुसार सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना लागू करणे आणि त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | **मा. व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी मांडलेले ऐनवेळचे विषय** |
| 184.5.1 | **आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडा, जि.बीड या मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासकेंद्राचा विद्यार्थी श्री.अविनाश साबळे, यांना बर्मिंगहॅम येथील कॉमनवेल्थ गेम्समध्ये तीन हजार मीटर टीपलचेस या क्रिडा प्रकारात रौप्य पदक प्राप्त केल्याची माहिती कुलसचिव डॉ.प्रकाश देशमुख यांनी दिली.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - व्यवस्थापन मंडळ सदस्यांनी श्री. अविनाथ साबळे यांनी मिळविलेल्या यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले व अभिनंदनाचा ठराव त्याच्या पालकास व्यवस्थापन मंडळाच्यावतीने द्यावा असे ठरले. तसेच सदर विद्यार्थ्यास पुढील व्यवस्थापन मंडळ बैठकीत सत्कारासाठी विद्यापीठ मुख्यालयात बोलवून त्याचा उचित सत्कार करावा व त्यास मुक्त विद्यापीठाचे शिक्षण मोफत द्यावे असे ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 184.5.2 | **राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अमलबजावणी करण्यासाठी विद्यापीठात एक समिती निर्माण करावी** अशी सुचना व्यवस्थापन मंडळ सदस्य मा.डॉ. महेंद्र लामा यांनी मांडली. विद्यापीठाची कार्यकक्षा विस्तारीत करण्यासाठी व गुणवत्तापूर्ण शिक्षण देश व विदेश पातळीवर सर्वांना उपलब्ध करून देण्यासाठी कार्यपध्दती निश्चित करण्यात यावी. तसेच विद्यापीठातील सर्व अध्यापकांनी शिक्षा मंत्रालय, भारत सरकार, व इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्याकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासंदर्भात प्रशिक्षीत मनुष्यबळ तयार व्हावेत यासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात नोंदणी करण्याबाबत सर्वांना आदेशित करावे अशी सूचना डॉ.सत्यकाम यांनी मांडली. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणासदंर्भात डॉ. महेंद्र लामा यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त करावी ती खालीलप्रमाणे<br>1. डॉ.महेंद्र लामा, अध्यक्ष 2. डॉ.अनिल कुलकर्णी, सदस्य<br>3. डॉ.सत्यकाम, सदस्य 4. डॉ.संजय चोरडिया, सदस्य<br>५. संचालक, निरंतरशिक्षण विद्याशाखा ६. संचालक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>७. परीक्षा नियंत्रक ८. संचालक, CIQA, सचिव |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीबाबत व्यवस्थापन मंडळाने सुचवेलेल्या समितीस मान्यता देण्यात आली. सदर समितीने केलेल्या कामाचा अहवाल पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत ठेवावा असे ठरले. |
| | 184.5.3 | **विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक 4 सप्टेंबर 2020 च्या राजपत्रानुसार व दिनांक 5 एप्रिल 2022 चे पत्र आणि दिनांक 01.06.2022 च्या CIQA संचालकाच्या पत्रानुसार शैक्षणिक वर्ष 2022-23 साठी कनिष्ठ महाविद्यालयात सुरु असलेले पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमाच्या अभ्यासकेंद्रावरील प्रथम वर्षाचे प्रवेश तुर्त स्थगित करण्याबाबतची कार्यवाही विद्यापीठाकडून करण्याबाबत करण्यात आलेली आहे. याविषयी व्यवस्थापन मंडळ सदस्य मा. डॉ. महेंद्र लामा यांनी प्रश्न उपस्थित केला.** |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करणे आवश्यक असल्याने त्यानुसार कार्यवाही केलेली आहे. संस्था / कनिष्ठ महाविद्यालयाच्या अभ्यासकेंद्रासंदर्भात महाराष्ट्र शासन, केंद सरकार, विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठपुरावा सुरु असल्याचे कुलसचिवांनी सांगितले. तसेच दिनांक २३ ऑगस्ट २०२२ ची विद्यापीठ अनुदान आयोगाची मुक्त व दुरशिक्षण संदर्भातील पब्लिक नोटीस सर्व सदस्यांच्या निदर्शनास आणून देण्यात आल्याने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 184.5.4 | **गिरनारे रोड (विद्यापीठ फाटा) ते विद्यापीठ मुख्यालय हा 2.5 कि.मी.चा रस्ता अतिशय खराब परिस्थितीत आहे. सदरचा रस्ता दुरूस्तीसाठी विद्यापीठाने निधी उपलब्ध करून देणेबाबत श्रीमती सरोज अहिरे यांनी प्रस्ताव सादर केला.**<br>यासंदर्भात सर्व बाबींची चर्चा होऊन व्यवस्थापन मंडळाने निर्णय घेतल्यास रस्त्यासाठी निधी उपलब्ध केला जाईल असे मा.कुलगुरूंनी मत व्यक्त केले. त्यावर यापूर्वीच व्यवस्थापन मंडळाने मान्यता दिली असल्याचे निदर्शनास आणून दिले. असे असले तरी डॉ.अनिल कुलकर्णी यांनी सदर रस्ता हा विद्यापीठाच्या मालकीचा नसल्याने त्यावर खर्च करणे विद्यापीठाला अडचणीचे ठरू शकते. त्यामुळे या रस्त्याची तातडीची गरज निकड लक्षात घेता नाशिक जिल्हा परिषदेचे कार्यकारी अधिकारी (सीओ) किंवा महाराष्ट्र शासनाकडून रस्त्याच्या कामासाठी विद्यापीठाने निधी उपलब्ध करून द्यावा असे पत्र आल्यास शासनास निधी उपलब्ध करून देणे शक्य होईल. ही वस्तुस्थिती व्यवस्थापक मंडळाच्या सदस्यांच्या लक्षात आणून दिली. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** — गिरनारे रोड ते विद्यापीठ मुख्यालय २.५ कि.मी. चा रस्ता करण्यासाठी शासनाकडून विद्यापीठाने निधी उपलब्ध करून द्यावा यासाठीचे पत्र प्राप्त झाल्यास निधी उपलब्ध करून द्यावा असे सर्वानुमते मान्य करण्यात आले. |

सभेच्या शेवटी सर्व सदस्यांचे आभार मानून मा.कुलगुरु तथा अध्यक्ष, सर्व सन्माननीय सदस्यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**